नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०६/२०२४ (गुरूवार) सायंकाळ**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण ३०,३८,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक १३/०६/२०२४ रोजी पहाटे ०३/२५ वा. दरम्यान पोस्टे मौदा येथील स्टाफ पो. स्टे. हद्दीत अवैध रेती वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना भंडारा ते नागपूर NH-53 रोडवर टिप्पर क्र. MH-40/CR-1212 हा येताना दिसल्याने मारोडी शिवारातील यादव पेट्रोलपंप जवळ नाकाबंदी दरम्यान टिप्परला थांबवून पाहणी केली असता १० चाकी टिप्पर क्र. MH-40/CR-1212 मध्ये अंदाजे ६ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्यांनी रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून टिप्पर क्र. MH-40/CR-1212 किं. रु. ३०,००,०००/— व त्यामधील ६ ब्रास रेती किं. रु. ३०,०००/— असा एकूण रु. ३०,३८,०००/— चा मुद्देमाल जप्त करून टिप्पर चालक नामे संजू पांडुरंग करमकार वय ४१ वर्ष, रा. आलेसुर ता. डोंगरी जी. भंडारा तसेच ट्रक मालक अविनाश हरिशचंद्र पडोळे, वय ४० वर्ष, रा. लापका रोड मौदा यांचे विरुद्ध पोस्टे मौदा येथे कलम ३७९, १०९, ३४ भा. द. वी. सहकलम ४८(७), ४८(८) महा. ज. म. स. सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधी. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. मौदा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पो. अधिकारी कामठी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार व पो.नि. सतीशसिंह राजपूत, सपोनी मनोज चौधरी, पोहवा. अनिल कोकोडे पो. हवा. गाटे, चापोहवा देवांगन, पो.अ शुभम ईश्वरकर, पो.अं अतुल निंबरते, पो. अं आशिष रडके यांनी केलेली आहे.

## जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पोस्टे एमआयडीसी बोरी अंतर्गत टेमरी देशी दारू दुकान समोर दिनांक १२/०६/२०२४ चे १९.३० वा. ते २०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे- प्रज्वल प्रदीप ढेगरे वय. २४ वर्ष, रा. बेसुर, ता. भिवापुर जि. नागपुर, हिंमाशु भोयर यांचे घरी किरायाने, टेंभरी ता. हिंगणा जि. नागपुर व आरोपी नामे- १) सुशांत महादेव झाडे रा मुल चंद्रपुर २) राम राजु पुंगाडी रा. गडचिरोली ३) रोशन चिंतामण सोनवणे रा. छिंदवाडा हे मित्र असुन फिर्यादी हा आपले उधारीचे पैसे आरोपीला मागण्या करिता गेला असता आरोपीतांनी त्याचा मनात राग धरून आपल्या हातातील काचेची बॉटल आरोपीतांनी संगनमत करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रीपोर्ट वरून पोस्टे एमआयडीसी बोरी येथे आरोपीतां विरूद्ध कलम ३०७, ५०४, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे एमआयडीसी बोरी येथील ठाणेदार सपोनि राजीव कर्मलवार यांचे नेतृत्वात त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर